# विद्या विकास मंडळाचे,सीताराम गोविंद पाटील कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री जिल्हा धुळे

# राष्ट्रीय सेवा योजना (NSS) २०२३-२०२४

# नियमित कार्यक्रमांचा अहवाल

महोदय,

शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ च्या राष्ट्रीय सेवा योजनेचा (NSS)नियमित कार्यक्रमांचा अहवाल मांडताना मला मनस्वी आनंद होत आहे.विद्यापीठाच्या सर्व सूचनांचे पालन करून आम्ही पुढील प्रमाणे कार्यक्रमांचे नियोजन करून कार्यक्रम यशस्वीपणे राबविले.

राष्ट्रीय सेवा योजनाएककाचे अध्यक्ष - महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र रामदास अहिरे
कार्यक्रम अधिकारी - डॉ. प्रदीप प्रल्हाद राठोड
सहाय्यक कार्यक्रम अधिकारी- प्रा. सुरेंद्रसिंग तेनसिंग मगर
महिला कार्यक्रम अधिकारी - डॉ. ज्योती सहदेव वाकोडे

| अ.क्र. | दिनांक | कार्यक्रमाचे नाव | कार्यक्रमाचे स्वरूप/अहवाल | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | ३०-०५-२०२३ | वार्षिक कृती आराखडा तयार करणे | शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ च्या NSS च्या कार्यक्रमांचे नियोजनासाठी विद्यापीठाच्या सूचनानुसार वार्षिक कृती आराखडा तयार केला. | |
| ०२ | ३०-०५-२०२३ | ऊर्जा स्रोत संवर्धन व पर्यावरण पूरक जीवनशैली आधारित कार्यशाळा | ऊर्जा स्रोत संवर्धन व पर्यावरण पूरक जीवनशैली आधारित आभासी कार्यशाळेचे आयोजन सी. गो. पाटील महाविद्यालयाच्या रासेयो एककाच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून मराठा विद्या प्रसारक समाज संस्था नाशिक येथील सिडको महाविद्यालयाचे भूगोल विभागाचे विभाग प्रमुख डॉ. ज्ञानेश्वर पवार हे होते तर अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे हे होते. प्रमुख अतिथी उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील आणि डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांची होती. कार्यशाळेच्या प्रमुख वक्त्यांचा परिचय डॉ. सचिन गोवर्धने यांनी करून दिला तर प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड सूत्रसंचालन महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. ज्योती वाकोडे आणि आभार सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. सुरेंद्रसिंग मगर यांनी मानले. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३ | ०३-०६-२०२३ | जागतिक सायकल दिनानिमित्त रॅली | ०३ जून २०२३ रोजी सायकल दिनानिमित्त महाविद्यालयाच्या रासेयो एककाच्या वतीने सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर आर. अहिरे उपप्राचार्य अनंत पाटील सर्व प्राध्यापक आणि प्राध्यापकेत्तर कर्मचारी तसेच साक्री शहरातील विविध क्षेत्रातील मंडळी आणि प्रसिद्ध डॉक्टर्स उपस्थित होते. या रॅलीला संबोधन करण्याचे काम डॉ. अनिल नांद्रे यांनी केले तर रॅलीला हिरवा झेंडा डॉ. घनश्याम अकलाडे यांनी दाखविला. या रॅलीला शहरातील अनेक नागरिकांनी हजेरी लावली आणि शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त राहण्याकरिता शपथ घेतली तसेच प्रदूषणाला आला घालण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाला उपस्थित सर्वांचे आभार कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड यांनी मानले. | |
| ०४ | २१-०६-२०२३ | आंतरराष्ट्रीय योगा दिवस | महाविद्यालयाच्या रासेयो एककाच्या वतीने आंतरराष्ट्रीय योगा दिनाचे औचित्य साधून सामूहिक योगाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील आय क्यू ए सी समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण आणि सर्व प्राध्यापक आणि कर्मचारी बांधव तसेच विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयाच्या प्रांगणात योगाचे आयोजन केले होते. या दरम्यान सर्वाना योगाचे प्रात्यक्षिक करून दाखविण्याकरिता मार्गदर्शक म्हणून डॉ. प्रीतम तोरवणे लाभले. त्यांनी विविध प्रकारचे योगा, आसने आणि प्राणायाम करून घेतले. आहि सर्वांना निरोगी आयुष्य कसे जगता येईल याविषयी माहिती दिली. | |
| ०५ | ३१-०७-२०२३ | जी २० युवा संवाद अंतर्गत भारत @ २०४७ अभियान | रासेयो एककाच्या वतीने आयोजित जी २० युवा संवाद अंतर्गत भारत@२०४७ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाकरिता उदघाटक म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्री चंद्रजीत सुरेश पाटील हे लाभले. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सचिन नांद्रे | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | संचालक रासेयो, कबचौ उमवि जळगाव हे होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे हे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील आणि प्राणिशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. लहू पवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. ज्योती वाकोडे यांनी केले तर प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड यांनी आणि आभार सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. सुरेंद्रसिंग मगर यांनी मानले. | |
| ०६ | ०९-०८-२०२३ | मेरी माटी मेरा देश ७५ वृक्षारोपण | मेरी माटी मेरा देश या उपक्रमांतर्गत महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार दत्तक गावामध्ये ७५ वृक्षांचे रोपण करण्याचे आयोजिले होते. त्यानुसार महाविद्यालयाच्या रासेयो एकाकाने दत्तक गाव नांदवन परिसरातील नागाई माता मंदिर येथे तसेच जि . प. मराठी शाळा नागरी कोकलेआणि महाविद्यालय परिसरात विविध उपयोगी वृक्षांचे रोपं करण्याचे योजिले त्यानुसार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर.अहिरे, उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. सुरेंद्रसिंग मगर, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. ज्योती वाकोडे यांनी स्वयंसेवकांच्या सहकार्याने वरील सर्व ठिकाणी विविध वृक्षांचे रोप लावले. याकरिता जि. प. मराठी शाळेचे मुख्याध्यापक, नागाई माता मंदिराचे मा. श्री १००८ प्रणवगिरीजी महाराज (बाबाजी) आणि गावातील नागरिक यांनी सहकार्य केले. | |
| ०७ | ११-०८-२०२३ | विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त वृक्षारोपण | उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव चे नामविस्तार कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव असे करण्यात आले होते. करीत या दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या रासेयो एककाच्या वतीने वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे हे होते तर प्रमुख | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | उपस्थिती उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील यांची होती. कार्यक्रमादरम्यान महाविद्यालयीन परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या करीता विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. | |
| | | | | |
| ०८ | १२-०८-२०२३ | आंतरराष्ट्रीय युवा दिवस निमित्त एच आय व्ही एड्स जनजागृती | महाविद्यालयाच्या रासेयो एककाच्या वतीने आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त एच आय व्ही एड्स विषयी जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला आभासी पद्धतीने मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निर्देशानुसार आरोग्य खाते यांच्यातर्फे आयोजन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाकरिता प्राथमिक आरोग्य केंद्र साक्री येथील एच आय व्ही एड्स समुपदेशक श्री योगेश नांद्रे श्री ज्ञानेश्वर बिऱ्हाडे यांनी मार्गदर्शन केले. आणि एच आय व्ही एड्स या रोगाविषयी आणि त्याच्या संक्रमणाविषयी माहिती दिली. या कार्यक्रमाचे संचालन कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड यांनी केले. तर आभार महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. ज्योती वाकोडे यांनी केले. | |
| ०९ | १४-०८-२०२३ | तिरंगा रॅली | विद्या विकास मंडळाच्या सीताराम गोविंद पाटील महाविद्यालयाच्या रासेयो एककाच्या वतीने 'मेरी माटी मेरा देश' या उपक्रमांतर्गत तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. रासेयो उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद राष्ट्रीय सेवा योजना विभाग कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या आवाहनानुसार आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत हर घर तिरंगा हा उपक्रम दि. १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान आयोजित करण्याचे आवाहन केले होते करीता महाविद्यालयाने १४ ऑगस्ट रोजी या रॅलीमध्ये १११ फूट लांबीचा तिरंगा घेऊन महाविद्यालय परिसर पासून पोळा चौक, मेन रोड ते | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | शिवाजी वाचनालय पर्यंत फिरविला. या रॅलीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, नगर पंचायत मुख्याधिकारी दीपक पाटील यांनी संबोधित केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड, प्रा. सुरेंद्रसिंग मगर, डॉ. ज्योती वाकोडे शारीरिक व क्रीडा संचालक डॉ हसीन तडवी यांनी परिश्रम घेतले. रॅलीमध्ये स्वयंसेवक आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. | |
| १० | २९-०८-२०२३ | माजी आमदार कै. गोजरताई भामरे स्मृतिदिन /एक दिवशीय श्रमदान शिबीर /रक्तदान शिबीर | माजी आमदार कै. गोजरताई भामरे स्मृतिदिन निमित्त राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास विभाग व राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीरचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला कै. गोजरताई भामरे यांच्या पुतळयास प्रमुख मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्या विकास मंडळ संस्थेचे सचिव मा. आबासाहेब सुरेश रामराव पाटील हे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वृद्धाश्रमाची संख्या उच्चशिक्षित विद्यार्थ्यांनी कमी करावी असा संदेश दिला. यासोबत युवतीसभेचे उदघाटन लोकनेते माणिकराव गावित महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. जयश्री माणिकराव गावित यांनी केले. तर प्रमुख पाहुणे म्हणून विद्या विकास मंडळाचे प्रशासकीय अधिकारी मा. प्राचार्य डॉ. डी . एल. तोरवणे हे होते. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. प्रकाश साळुंके यांनी केले. प्रास्ताविक प्राचार्य, डॉ. आर. आर. अहिरे यांनी केले. तर आभार डॉ. प्रदीप राठोड यांनी मानले. कार्यक्रमाला संशोधक सिद्धार्थ देवरे (इटली), रक्तपेढी प्रमुख डॉ. महेश जोशी, उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील आणि सर्व प्राध्यापक बंधू उपस्थित होते. त्यानंतर वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने पर्यावरण पूरक रांगोळीचे आणि फ्लॉवर डेकोरेशन चे आयोजन करण्यात आले होते यात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमानंतर स्वयंसेवक, विद्यार्थी आणि नागरिकांनी रक्तदान केले | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | यामध्ये ३३ रक्तदात्यांनी रक्तदान केले तर २१५ जणांनी रक्तगट तपासणीचा लाभ घेतला. रक्तसंकलन आणि रक्तगट तपासणीकरिता स्व. भाऊसाहेब हिरे शासकीय रुग्णालय धुळे यांचे यांचे सहकार्य लाभले. | |
| ११ | ०१-०९-२०२३ | कबचौ उमवि जळगाव येथे पारितोषिक वितरण | राष्ट्रीय सेवा योजना विभाग कवयित्री बहिणाबाई उत्तर महाराष्ट्र विदयापीठ जळगाव यांच्या वतीने आयोजित पुरस्कार वितरण सोहळयामध्ये विद्या विकास मंडळाच्या सीताराम गोविंद पाटील महाविद्यालय साक्री येथील रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड यांना साहसी क्रीडा शिबीर चिखलदरा, अमरावती येथे उत्कृष्ठ संघनायक म्हणून कामगिरी केल्याबद्दल गौरव करण्यात आला. कु. रुचिता चाल्स हिला धुळे जिल्हा उत्कृष्ठ स्वयंसेवक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच आरका जैन विद्यापीठ जमशेदपूर झारखंड येथेराष्ट्रीय एकात्मता शिबिरामध्ये महाविद्यालयाचे स्वयंसेवक कु. प्रतिमा गावित आणि दिलीप बचकार यांनी सहभाग नोंदवून उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. आणि कु. उत्कर्ष सोनार हिने उत्कर्ष शिबीर नागपूर येथे तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे आयोजित पुणे ते पंढरपूर पायी यात्रा यामध्ये शुभम सोनावणे सहभागी झाल्याबद्दल विद्यापीठाने त्यांचा गौरव केला. या कार्यक्रमाला विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. डॉ. एस टी . इंगळे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. जे. डी . लेकुरवाळे आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. सचिन नांद्रे उपस्थित होते. | |
| १२ | २६-०९-२०२३ | राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे उदघाटन | विद्या विकास मंडळाच्या सीताराम गोविंद पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सन २०२३-२४ चे उदघाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील, प्रमुख अतिथी डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण तर प्रमुख मार्गदर्शक प्रा. विश्वास भामरे विभागीय समन्वयक रासेयो साक्री हे होते. स्वयंसेवकांना मार्गदर्शन करतांना राष्ट्रीय सेवा | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | योजना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात महत्वाची भूमिका पार पडते असे मत प्रा. विश्वास भामरे यांनी मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ज्योती वाकोडे यांनी तर प्रास्ताविक डॉ. प्रदिप राठोड आणि आभार प्रा. सुरेंद्रसिंग मगर यांनी मानले. कार्यक्रमाच्या तांत्रिक बाजू प्रा. रवींद्र मोरे यांनी सांभाळली | |
| १३ | ०१-१०-२०२३ | स्वच्छता ही सेवा | दि. ०१ ऑक्टोबर २०२३ रोजी महात्मा गांधी यांचा आदर्श ठेवून महाविद्यालयाच्या रासेयो एककाच्या वतीने एकदिवशीय शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे तर प्रमुख अतिथी उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील हे होते. प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. त्यानंतर स्वयंसेवकांनी स्वच्छता ही सेवा या कार्यक्रमप्रसंगी महात्मा गांधी आदर्श समोर ठेवून स्वच्छतेचा संदेश देत संपूर्ण महाविद्यालय परिसराची साफसफाई केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड, सुरेंद्रसिंग मगर आणि डॉ. ज्योती वाकोडे यांनी परिश्रम घेतले. | |
| १४ | ०२-१०-२०२३ | महात्मा गांधी जयंती | दि. ०१ ऑक्टोबर २०२३ रोजी महात्मा गांधी जयंती निमित्त महाविद्यालयाच्या रासेयो एककाच्या वतीने एकदिवशीय शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे तर प्रमुख अतिथी उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील हे होते तसेच सर्व प्राध्यापक आणि प्राध्यापकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी यांच्या फोटोला पुष्पहार घालून करण्यात आली. प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. त्यानंतर स्वयंसेवकांनी स्वच्छतेचा संदेश देत संपूर्ण महाविद्यालय परिसराची साफसफाई केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड, सुरेंद्रसिंग मगर आणि डॉ. ज्योती वाकोडे यांनी परिश्रम | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | घेतले. | |
| १५ | १४-१०-२०२३ | अमृत कलश यात्रा | विद्या विकास मंडळाच्या सीताराम गोविंद पाटील महाविद्यालयाच्या रासेयो एककाच्या वतीने 'मेरी माटी मेरा देश' या उपक्रमांतर्गत अमृत कलश यात्रेचे आयोजन करण्यात आले. रासेयो उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद राष्ट्रीय सेवा योजना विभाग कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या आवाहनानुसार मेरी माटी मेरा देश हा उपक्रम आयोजित करण्याचे आवाहन केले होते करीता महाविद्यालयाने १४ ऑक्टोबर २०२३ रोजी यात्रेचे आयोजन केले. यात्रा महाविद्यालय परिसर पासून बसस्थानक परिसर पर्यंत काढयनात आली. या यात्रेला विद्या विकास मंडळाचे सचिव मा. आबासाहेब सुरेश रामराव पाटील आणि डॉ सचिन नांद्रे संचालक, रासेयो कबचौ उमवि जळगाव यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे यांनी यात्रेला संबोधित केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड, प्रा. सुरेंद्रसिंग मगर, डॉ. ज्योती वाकोडे शारीरिक व क्रीडा संचालक डॉ हसीन तडवी यांनी परिश्रम घेतले. यात्रेमध्ये स्वयंसेवक आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. | |
| १६ | २६-११-२०२४ | संविधान दिन | विद्या विकास मंडळाच्या सीताराम गोविंद पाटील कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय साक्री यांच्या राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने आयोजित संविधान दिनानिमित्त कार्यक्रमामध्ये ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाकरिता व्याख्याते म्हणून मराठी अभ्यास मंडळाचे माजी अध्यक्ष प्राध्यापक एल. जी. सोनावणे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सचिन नांद्रे संचालक रासेयो कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे तर प्रमुख | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | उपस्थिती उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील यांची होती. प्रा. प्रा. एल. जी. सोनावणे यांनी 'शिकायचं कशासाठी' या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांनी तर आभार कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता प्रा. विश्वास भामरे, डॉ. दीपक नगराळे, डॉ. हसिन तडवी, प्रा. सुरेंद्रसिंग मगर, डॉ. ज्योती वाकोडे आणि श्री शरद बोरसे यांनी परिश्रम घेतले. | |
| १७ | ०७-११-२०२३ | एकदिवशीय शिबीर आणि वेबिनार | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव आणि विद्या विकास मंडळाचे सीताराम गोविंद पाटील महाविद्यालय साक्री यांच्या संयुक्त विद्यमाने 'राष्ट्रनिर्मितीत राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान' या विषयावर एकदिवशीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून राष्ट्रपती पुरस्कार विजेते स्वयंसेवक प्रतीक कदम आणि देवेंद्र खन्ना हे लाभले. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सचिन नांद्रे संचालक कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव आणि डॉ. अजय शिंदे क्षेत्रीय संचालक राष्ट्रीय सेवा योजना महाराष्ट्र आणि गोवा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे हे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रदीप राठोड यांनी तर आभार डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांनी मानले. | |
| १८ | ०८-१२-२०२३ | जागतिक एच आय व्ही एड्स जागरूकता रॅली | विद्या विकास मंडळाच्या सीताराम गोविंद पाटील महाविद्यालय साक्री यांच्या राष्ट्रीय सेवा योजना एकक आणि साक्री ग्रामीण रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एच आय व्ही एड्स जनजागृतीपर रॅलीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये एड्स या आजाराविषयी जनजागृती, शपथवाचं आणि रॅलीचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे आणि साक्री ग्रामीण रुग्णालयाचे वैधकीय अधीक्षक डॉ. हर्षवर्धन | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | चित्तम यांनी मार्गदर्शन केले. रॅलीमध्ये एड्स आजाराविषयी माहिती देण्याचे काम एच आय व्ही एड्स समुपदेशक श्री योगेश नांद्रे केले आणि स्वयंसेवकांकडून शपथभवाचं करून घेतली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड, डॉ. ज्योती वाकोडे आणि प्रा. सुरेंद्रसिंग मगर यांनी काम पाहिले | |
| १९ | ११-१२-२०२३ | विकसित भारत@२०४७ | राष्ट्रीय खेळ व क्रीडा मंत्रालय दिल्ली यांच्या वतीने आयोजित कार्यक्रम 'विकसित भारत@२०२४७' युवकांचा आवाज यु ट्यूब वर प्रसारित केलेल्या कार्यक्रमाचे आयोजन करून स्वयंसेवकांना या कार्यक्रमात मा. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला डॉ. सचिन नांद्रे संचालक रासेयो कवयित्री ब्वाहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र जळगाव अध्यक्ष म्हणून उपस्थित होते तर कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. प्रकाश साळुंके, डॉ. एन. डी. भामरे, डॉ. दीपक नागराळे हे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. पंकज अहिरे यांनी केले तर आभार डॉ. प्रदीप राठोड यांनी मानले | |
| २० | २५-०१-२०२४ | राष्ट्रीय मतदार दिवस | विद्या विकास मंडळाच्या सीताराम गोविंद पाटील कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय साक्री यांच्या राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या आणि तहसील कार्यालय साक्री यांच्या संयुक्त वतीने आयोजित राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्त मतदार जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष धुळे जिल्हाधिकारी ताठ जिल्हा निवडणूक अधिकारी श्री अभिनव गोयल यांनी मार्गदर्शन केले. तसेच प्रमुख अतिथी म्हणून उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्री अरविंद अंतुर्लीकर, मतदार नोंदणी अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी रोहयो श्री नितीन मुंडावरे, विद्या विकास मंडळाचे प्रशासकीय अधिकारी मा. प्राचार्य डॉ. डी . एल. तोरवणे, मा. तहसीलदार श्री साहेबराव | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | सोनावणे, साक्री पोलीस निरीक्षक श्री संजय सूर्यवंशी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, अप्पर तहसीलदार श्री दत्तात्रय शेजूळ, उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील हे उपस्थित होते. या कार्यक्रमादरम्यान मतदार आणि नवमतदार तसेच दिव्यांग मतदार यांचा समावेश होता. नवमतदारांमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आगामी निवडणुकांमध्ये मतदानाचा हक्क बजावण्याची शपथ घेतली. | |
| २१ | २८-०३-२०२४ | राष्ट्रीय मतदार जनजागृती कार्यक्रम आणि रॅली | भारत निवडणूक आयोग, युवा कार्य व खेळ मंत्रालय रासेयो क्षेत्रीय निर्देशालाय पुणे, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव राष्ट्रीय सेवा योजना एकक विद्या विकास मंडळाचे सीताराम गोविंद पाटील महाविद्यालय साक्री आणि तहसील कार्यालय साक्री यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मतदान जनजागृतीपर रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीला मार्गदर्शक म्हणून उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्री नितीन मुंडावरे, साक्री तहसील चे तहसीलदार श्री साहेबराव सोनावणे प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील, गटशिक्षणाधिकारी राजेंद्र पगारे, निवडणूक नायब तहसीलदार श्री राजेंद्र सोनावणे लाभले होते. या रॅलीपूर्वी महाविद्यालयामध्ये मप्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे यांनी विद्यार्थ्यांना मतदान आणि त्याचे फायदे या विषयावर मार्गदर्शन केले. त्यानंतर विविध मतदान जनजागृतीपर फलक लावून घोषणा देत रॅली बसस्थानक, बाजारपेठ मार्गे संपूर्ण गावातून जात तहसील येथे रॅलीचा समारोप करण्यात आला. समारोपप्रसंगी वरील सर्व मान्यवरांनी मांडतानाच हक्क बजावण्याकरिता आपले अधिकार याविषयी मार्गदर्शन केले. आणि आगामी काळात निवडणुकांमध्ये मतदान करण्याचे सर्वांना आवाहन केले. कार्यक्रम आणि रॅलीच्या यशस्वीतेकरिता कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड, प्रा. सुरेंद्रसिंग मगर, प्रा. विश्वास भामरे, डॉ. ज्ञानेश्वर | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | चव्हाण यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रम आणि रॅलीकरिता बहुसंख्य विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते. | |

लोकमत

# साक्री येथे सायकल रॅली

लोकमत न्यूज नेटवर्क

**साक्री :** येथील विद्या विकास मंडळाचे महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना व सायकलिंग ग्रुप साक्रीच्या संयुक्त विद्यमाने जागतिक सायकल दिनानिमित्त शनिवारी सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

सायकल रॅलीचा डॉ. घनश्याम अकलाडे यांनी हिरवा झेंडा दाखवून सुरुवात केली. सायकल रॅलीची सुरुवात साक्री येथील सी. गो. पाटील महाविद्यालयाच्या प्रांगणातून झाली. नंतर साक्री शहरातील प्रमुख रस्त्यावरून जात नवापूर बायपास रोड मार्गे परत महाविद्यालयाच्या प्रांगणात समारोप करण्यात आला. सदर सायकल रॅलीत प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील, कार्यालयीन अधीक्षक जी. वाय. पाटील, न्यू इंग्लिश स्कूलचे पर्यवेक्षक मुन्ना करंजे, धनंजय सोनवणे, मिलिंद सोनवणे, राकेश अहिरराव, क्रीडा संचालक डॉ. हसीन खा तडवी यांनी सहभाग घेतला. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे महाविद्यालयाच्या प्रांगणात हजर असलेला छोटा सायकल प्रेमी अवनीश नीलेश वाघ हादेखील या सायकल रॅलीत सहभागी झाला.

सायकल रॅलीच्या समारोपप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी डॉ. प्रदीप राठोड यांनी आभार मानले. सदर सायकल रॅलीत साक्री शहरातील सायकल प्रेमी तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

Hello Dhule
Page No. 4 Jun 04, 2023
Powered by: erelego.com

लोकमत



साक्री येथे जागतिक सायकल दिनानिमित्त काढण्यात आलेल्या सायकल रॅलीचा शुभारंभ करतांना डॉ.घनश्याम अकलाडे.

Hello Dhule
Page No. 4 Jun 04, 2023
Powered by: erelego.com

# भारताला विकसित करून महासत्ता बनविण्याचे सामर्थ्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांमध्ये आहे : डॉ.सचिन नांद्रे



**साक्री (अनिल देसले,दै.धुळे दवंडी)**: भारताला विकसित करून महासत्ता बनविण्याचे सामर्थ्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांमध्ये असून जी२० युवा संवाद अंतर्गत भारत @ २०४७ अभियानाच्या अमृत काळातील पंचप्रण चे अवलंबन करून स्वयंसेवकांनी या महत्तम कार्यात आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव चे राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ सचिन नांद्रे यांनी केले. युवक व क्रीडा मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली राष्ट्रीय सेवा योजना उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, राष्ट्रीय सेवा योजना कवित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या समन्वयाने विद्याविकास मंडळाची सिताराम गोविंद पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री जि धुळे येथे आयोजित केलेल्या G-२० युवा संवाद भारत @ २०४७ संमेलनात बोलत होते. सदर संमेलनाची उद्घाटन विद्या विकास मंडळाचे उपाध्यक्ष चंद्रजीत सुरेश पाटील यांच्या हस्ते झाले. अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राजेंद्र अहिरे होते. उपप्राचार्य डॉ अनंत पाटील, प्राणीशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ लहू पवार प्रसंगी उपस्थित होते. उद्घाटकीय मनोगतात विद्या विकास मंडळाचे उपाध्यक्ष चंद्रजीत सुरेश पाटील यांनी युवा म्हणून आपले कर्तव्य बजावत असताना विद्यार्थ्यांनी देशाप्रती आणि समाजाप्रती नेहमी कृतज्ञ रहावे असे मत व्यक्त केले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या आजच्या युगात विविध कौशल्यपूर्ण ज्ञान संपादन करून स्वयंविकासासोबतच देशाच्या प्रगतीसाठी देखील कार्य करावे असे देखील मत त्यांनी प्रसंगी व्यक्त केले. संचालक डॉ सचिन नांद्रे यांनी पुढे आपल्या मनोगतात जी-२० या जागतिक

# सी. गो. पाटील विद्यालयात १११ फूट तिरंगा रॅलीचे आयोजन




साक्री – येथील विद्या विकास मंडळाचे सिताराम गोविंद पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री तसेच अखिल भारतीय विद्यार्थी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्य दिनानिमित्त १४ ऑगस्ट रोजी १११ फूट तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद, राष्ट्रीय सेवा योजना विभाग कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव यांच्या आव्हानानुसार आजादी का अमृत महोत्सवा अंतर्गत हर घर तिरंगा हा उपक्रम दि १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत साजरा करण्यात येत आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून सदर तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या प्रांगणापासून रॅलीची सुरुवात होत साक्री शहरातील पोळा चौक, मेन रोड असे मार्गक्रमण करत शिवाजी वाचनालयाजवळ रॅलीचा समारोप झाला.

समारोपा प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राजेंद्र अहिरे यांनी रॅलीला संबोधित करताना सांगितले की,भारताचे आदरणीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी आपल्याला केलेल्या आव्हानानुसार सेल्फी विथ तिरंगा या अभियानाचा भाग बनुन आपल्या तिरंग्या विषयीचे प्रेम जागृत करावे. हर घर तिरंगा या अभियानाचा भाग म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या घरावर अभिमानपूर्वक तिरंगा फडकवावा असे देखील आव्हान त्यांनी प्रसंगी केले. साक्री नगरपंचायतीने आयोजित केलेल्या मेरी मिट्टी मेरा देश या उपक्रमात रॅलीतील सहभागी सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सदर उपक्रमात प्रसंगी नगरपंचायतीचे मुख्य अधिकारी दीपक पाटील व त्यांचे कर्मचारी उपस्थित होते.

सदर रॅलीच्या आयोजना प्रसंगी पोलीस निरीक्षक मोतीराम निकम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ अनंत पाटील, पर्यवेक्षक प्रा डी पी पाटील, शारीरिक व क्रीडा संचालक डॉ हसीन खा तडवी,विद्यार्थी विकास अधिकारी डॉ पंकज अहिरे, राष्ट्रीय सेवा योजनेचे डॉ प्रदीप राठोड,राष्ट्रीय छात्र सेनेचे डॉ चंद्रकांत कढरे तसेच

सकाळ TODAY

# उच्च शिक्षितांनी वृद्धाश्रमांची संख्या घटवावी

## सुरेश पाटील : माजी आमदार गोजरताई भामरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त रक्तदान शिबिर

▸ सकाळ वृत्तसेवा

म्हसदी, ता. २९ : आई-वडिलांची सेवा हीच सर्वश्रेष्ठ असून, उच्च शिक्षित झालेल्या विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमांची संख्या कमी होण्यासाठी नेहमी प्रयत्नरत राहावे, असे आवाहन साक्री येथील विद्या विकास मंडळाचे सचिव तथा ज्येष्ठ नेते सुरेश रामराव पाटील यांनी केले.

साक्रीत विद्या विकास मंडळाच्या सीताराम गोविंद पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा विभाग व विद्यार्थी विकास विभागातर्फे माजी आमदार (स्व.) गोजरताई रामराव भामरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त रक्तदान, रक्तगट तपासणी शिबिर व युवती सभेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. विसरवाडी येथील लोकनेते माणिकराव गावित महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. जयश्री माणिकराव गावित यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. विद्या विकास मंडळाचे प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. एल. तोरवणे, धुळे येथील शासकीय रुग्णालयातील रक्तपेढीप्रमुख डॉ. महेश जोशी, प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील, साक्री तालुक्यातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. प्राचार्या डॉ. गावित यांनी ज्या घटकांना व्यक्त होता येत नाही अशा आदिवासी महिलांचे नेतृत्व माजी आमदार (स्व.) गोजरताई भामरे यांनी सक्षम पद्धतीने केले आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जाणीव गोजरताईंना होती. सामाजिक प्रश्नांची योग्य ती जाण ठेवून राजकारणातदेखील त्यांनी आपला स्वतंत्र ठसा उमटविला .विद्यार्थिनींनी गोजरताईंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून अभ्यासात लक्ष घालावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील यांनी प्रास्ताविक केले. रक्तदान शिबिरात ३३ दात्यांनी रक्तदान केले. २१५ विद्यार्थ्यांनी रक्तगट तपासणी करून घेतली. वनस्पतिशास्त्र विभागाच्या सलाद डेकोरेशन स्पर्धेत देवश्री बागूल प्रथम, जोहा पठाण व आईशा पठाण द्वितीय, मेहेक शेख तृतीय व गायत्री कापडे व पूनम हिरे उत्तेजनार्थ, फ्लॉवर अँरेजमेंट स्पर्धेत नलिनी चांदुरकर प्रथम, यश वैष्णव द्वितीय, गोपाळ पावरा तृतीय, मयूरी खैरनार उत्तेजनार्थ, फ्लॉवर रांगोळी स्पर्धेत दिव्या भामटे प्रथम, कुणाल सोनवणे व दुर्गेश घरटे द्वितीय, अदिती सरक तृतीय, हर्षदा अहिरराव व मनीषा पवार यांनी उत्तेजनार्थ क्रमांक पटकावला. डॉ. चंद्रकांत कढरे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पंकज अहिरे यांनी आभार मानले. यशस्वितेसाठी संयोजन समितीचे डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, प्रा. विश्वास भामरे, डॉ. लहू पवार, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. प्रदीप राठोड, शारीरिक व क्रीडा संचालक डॉ. हसीनखा तडवी, रासेयो सहाय्यक अधिकारी प्रा. सुरेंद्र मगर, युवती सभेच्या प्रमुख ज्योती वाकोडे यांनी प्रयत्न केले.





साक्री : सी. गो. पाटील महाविद्यालयात माजी आमदार (स्व.) गोजरताई भामरे यांना अभिवादनप्रसंगी उपस्थित संस्थेचे सचिव सुरेश रामराव पाटील, डॉ. डी. एल. तोरवणे, प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, प्राचार्या डॉ. जयश्री गावित. दुसऱ्या छायाचित्रात मार्गदर्शन करताना संस्थेचे सचिव सुरेश रामराव पाटील.

सकाळ 9/9/2023

# रासेयोचे अधिकारी, स्वयंसेवक पुरस्काराने सन्मानित

**म्हसदी, ता. ८ :** साक्री येथील विद्या विकास मंडळाच्या सीताराम गोविंद पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी डॉ. प्रदीप राठोड यांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने सेवा गौरव पुरस्कार देऊन जळगावात नुकतेच सन्मानित केले.



**जळगाव : विद्यापीठात साक्रीच्या सी. गो. पाटील महाविद्यालयाच्या रुचिता चाळसेला उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार प्रदान करताना प्र. कुलगुरू डॉ. एस. टी. इंगळे, रासेयोचे संचालक डॉ. सचिन नांद्रे. शेजारी प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे.**

प्र. कुलगुरू प्रा. डॉ. एस. टी. इंगळे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. जे. डी. लेकुरवाळे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. सचिन नांद्रे, साक्री महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, प्रा. विश्वास भामरे उपस्थित होते. रुचिता जगदीश चाळसे हिला उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कारदेखील प्रदान करण्यात आला. महाविद्यालयातील प्रतिमा गावित व दिलीप भगवान बाचकर यांनी आरका जैन विद्यापीठातील (जमशेदपूर झारखंड) राष्ट्रीय शिबिरात यशस्वी सहभाग घेतल्याबद्दल त्यांनादेखील गौरविण्यात आले. उत्कर्षा जितेंद्र सोनार व शुभम अशोक सोनवणे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमात यशस्वी सहभाग घेतल्याबद्दल त्यांनादेखील पुरस्काराने गौरविण्यात आले. विद्यार्थी व अधिकाऱ्यांना कार्यगौरव पुरस्काराने गौरविण्यात आल्याबद्दल विद्या विकास मंडळाचे सचिव सुरेश रामराव पाटील, अध्यक्षा मंगलाताई सुरेश पाटील, उपाध्यक्ष चंद्रजित पाटील, प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. एल. तोरवणे, प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील यांनी अभिनंदन केले.



# विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजना महत्त्वपूर्ण : प्रा. विश्वास भामरे

साक्री – व्यक्तिमत्व विकसित करण्यासाठी व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजना महत्वपूर्ण असून, विद्यार्थ्यांनी या सक्रियपणे सहभागी व्हावे असे मत रासेयो विभागीय समन्वयक प्रा विश्वास भामरे यांनी व्यक्त केले.

विद्या विकास मंडळाचे सिताराम गोविंद पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री येथे राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त आयोजित राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या उद्घाटनाप्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ अनंत पाटील होते.प्रसंगी आयक्यूएसी समन्वयक डॉ ज्ञानेश्वर चव्हाण, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ प्रदीप राठोड, सहाय्यक अधिकारी प्रा सुरेंद्र सिंग मगर, महिला कार्यक्रमाधिकारी डॉ ज्योती वाकोडे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ पंकज अहिरे उपस्थित होते. अध्यक्षीय समारोपात उपप्राचार्य डॉ अनंत पाटील यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून राष्ट्र उभारणीचे कार्य केले जाते असे मत व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ प्रदीप राठोड यांनी केले.कार्यक्रमाचे संचालन डॉ ज्योति वाकोडे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा सुरेंद्र सिंग मगर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा रवींद्र मोरे यांनी परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक बहुसंख्येने उपस्थित होते.

सकाळ TODAY

# 'मेरी माटी-मेरा देश' अभियानांतर्गत साक्री महाविद्यालयात अमृतकलश यात्रा

**म्हसदी, ता. १४ :** 'मेरी माटी-मेरा देश' अभियानात विद्यार्थ्यांना व सर्व भारतीयांना प्रोत्साहित केले जात असल्याचे मत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी व्यक्त केले.

साक्रीत विद्या विकास मंडळाच्या सीताराम गोविंद पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात 'मेरी माटी-मेरा देश' अभियानांतर्गत अमृतकलश यात्रेप्रसंगी ते बोलत होते. यात्रेत भाजपचे ज्येष्ठ नेते, विद्या विकास मंडळाचे सचिव सुरेश पाटील यांनीही मार्गदर्शन केले. प्राचार्य राजेंद्र अहिरे, उपप्राचार्य डॉ अनंत पाटील, 'रासेयो'चे विभागीय समन्वयक प्रा. विश्वास भामरे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, 'रासेयो' कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड उपस्थित होते. डॉ. नांद्रे यांनी देशभरातून अमृतकलश २९ ऑक्टोबरला कर्तव्य पथावर आणून तेथे अमृतवाटिका तयार करण्यात येणार असल्याचे सांगितले. प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे यांनी विद्यार्थी व समाजामध्ये देशप्रेमाची भावना निर्माण होण्यासाठी महान विभूतींना आदरांजली देण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले.

अमृतकलश यात्रेचा प्रारंभ महाविद्यालयातून होत साक्री शहरातील प्रमुख रस्त्यावरून जात एसटी आगारात सांगता झाली. सांगतेप्रसंगी डॉ. सचिन नांद्रे मार्गदर्शन केले. रासेयोचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. सुरेंद्रसिंग मगर, डॉ.ज्योती वाकोडे, शरद बोरसे, प्रशांत बोरसे, स्वप्नील देवरे यांनी प्रयत्न केले.



**साक्री : अमृतकलश यात्रेत शनिवारी सहभागी झालेले भाजपचे प्रांतिक सदस्य तथा ज्येष्ठ नेते सुरेश पाटील, प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, प्राध्यापक व विद्यार्थी.**

# महात्मा फुलेंनी शेतकरी कष्टकऱ्यांना निसर्गदत्त अधिकार उपभोगण्यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम करण्याचे काम केले : प्रा. एल. जी. सोनवणे

साक्री - समस्त शेतकऱ्यांच्या, पददलितांच्या, शुद्राती-शूद्र व कष्टकऱ्यांच्या पायातील गुलामीच्या बेड्या तोडून त्यांना निसर्ग दत्त अधिकार उपभोगन्यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम करण्याचे कार्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी केले, असे मत मराठी अभ्यास मंडळाचे माजी अध्यक्ष प्रा एल जी सोनवणे यांनी व्यक्त केले. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्या विकास मंडळाचे सिताराम गोविंद पाटील कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय साक्री यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महात्मा फुले व्याख्यानमालेत शिकायचं कशासाठी? या विषयावर ते बोलत होते. ऑनलाइन पार पडलेल्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून कबचौ उमवी जळगाव, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ सचिन नांद्रे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ राजेंद्र अहिरे होते. प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ अनंत पाटील प्रसंगी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ सचिन नांद्रे यांनी केले.प्रा एल जी सोनवणे हे पुढे बोलताना म्हणाले की, शिक्षण हा व्यक्तीच्या सर्वांगीण विकासातील अतिशय महत्त्वाचा घटक असून विद्या बरोबरच शिलाची जोड असल्यास यशाचा मार्ग अधिक सुकर होतो. विद्यार्थ्यांनी संकटांना घाबरून खचून न जाता योग्य ते ध्येय डोळ्यासमोर ठेवून अविरत अध्ययन करत राहावे असे देखील त्यांनी प्रतिपादित केले.

प्राचार्य डॉ राजेंद्र अहिरे अध्यक्षीय समारोपात बोलताना म्हणाले की,राष्ट्रपिता महात्मा फुलेंनी घालून दिलेला वैचारिक वसा विद्यार्थ्यांना यशस्वी जीवन व्यतीत करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या विचारांचे पाईक होऊन विद्यार्थ्यांनी सक्षमपणे शिक्षणाची कास धरावी असे देखील मत त्यांनी प्रसंगी व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचलन सदर कार्यक्रमाचे समन्वयक डॉ ज्ञानेश्वर चव्हाण यांनी तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ प्रदीप राठोड यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समन्वय समितीचे डॉ दीपक नगराळे,रासेयो विभागीय समन्वय प्रा विश्वास भामरे,डॉ हसीन का तडवी,डॉ ज्योती वाकोडे,प्रा सुरेंद्र सिंग मगर,श्री शरद बोरसे यांनी प्रयत्न केले. ऑनलाइन पार पडलेल्या या व्याख्यानमालेत विद्यापीठ परिसरातील मान्यवर,विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.




नियमित वाचा
दैनिक तोफ

पान १ वरून

### हिरोला पोलीसांनी केले झिरो

शिक्षणासाठी धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा तालुक्यातील विटाई गावात राहत असून त्याचे नाव राज हिम्मत पवार (२१)असल्याचे समोर आले असून संबधित तरुण महाविद्यालयात शिक्षण घेत असल्याचे सांगण्यात आले. पोलिसांनी व्हिडियो प्रसारित झालेल्या ठिकाणी देवपूर बस स्टँड येथे संबधित तरुणास विद्यार्थिनींससमोर कान पकडून माफी मागण्यास सांगितले. यावेळी पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे, देवपूर पोलिस ठाण्याचे निरीक्षक सतीश घोटेकर, हेड कॉन्स्टेबल मिलिंद सोनवणे, मच्छिंद्र पाटील, पंकज चव्हाण, शशिकांत देवरे, मुकेश वाघ, जितेंद्र वाघ यांसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

लोकमत

# स्वयंसेवक सक्रियतेने योगदान देत स्वत:ला सिद्ध करतात!

## 'रासेयो'चे महाराष्ट्र समन्वयक डॉ. अजय शिंदे यांचे प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**साक्री :** राष्ट्रासमोर तथा समाजासमोर येणाऱ्या विविध संकटांना सामोरे जाण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून तयार झालेले स्वयंसेवक नेहमी सक्रियतेने आपले योगदान देऊन स्वत:ला सिद्ध करतात, असे मत राष्ट्रीय सेवा योजनेचे महाराष्ट्र व गोव्याचे क्षेत्रीय समन्वयक डॉ. अजय शिंदे यांनी व्यक्त केले. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्या विकास मंडळाचे सीताराम गोविंद पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'राष्ट्रनिर्मितीत राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान' या विषयावरील राष्ट्रीय वेबिनारप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला वक्ते म्हणून राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक देवेंद्र खन्ना व प्रतीक कदम उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सचिन नांद्रे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे होते. उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील याप्रसंगी उपस्थित होते. या वेळी डॉ. सचिन नांद्रे यांनी मनोगत व्यक्त केले.

देवेंद्र खन्ना म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास जागृत केला जातो. ज्याच्या आधारे विद्यार्थ्यांच्या स्वयंविकासासोबतच इतरांप्रतीचे कर्तव्यदेखील त्याला ज्ञात होते. प्रतीक कदम यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना राष्ट्रपती पुरस्कारप्राप्तीसाठी कोणते गुण स्वयंसेवकांमध्ये असावेत, यासंबंधीची सविस्तर माहिती दिली. डॉ. राजेंद्र अहिरे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून समाजातील विविध विषयांचे ज्ञान विद्यार्थ्यांना होऊन परिपक्व व सक्षम विद्यार्थी घडविण्याचे कार्य या माध्यमातून होत असते, असे मत व्यक्त केले.

सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड यांनी केले तर आभार ज्ञानेश्वर चव्हाण यांनी मानले. यावेळी ज्योती वाकोडे, प्रा. सुरेंद्र सिंग मगर, प्रा. विश्वास भामरे, डॉ. दीपक नगराळे, डॉ. हसीनखा तडवी आदी उपस्थित होते.

Hello Dhule
Page No. 2 Dec 01, 2023
Powered by: erelego.com

सकाळ TODAY



**साक्री : सी. गो. पाटील महाविद्यालयात एड्स जनजागृती रॅलीत सहभागी विद्यार्थी व प्राध्यापक.**

## साक्रीत एड्स जनजागृतीसाठी रॅली

म्हसदी : साक्री येथील सी. गो. पाटील महाविद्यालयात १ डिसेंबरला जागतिक एड्स दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभाग व साक्री ग्रामीण रुग्णालय यांच्यातर्फे एचआयव्ही एड्सबाबत जनजागृती कार्यक्रम व शपथवाचन रॅली काढण्यात आली. ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. हर्षवर्धन चित्तम व सी. गो. पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. आर. आर. अहिरे यांनी मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमात ग्रामीण रुग्णालय समुपदेशक योगेश नांद्रे यांनी एचआयव्ही एड्स आजाराबाबत मार्गदर्शन केले. उपप्राचार्य डॉ. आनंद पाटील यांनीही माहिती दिली. ग्रामीण रुग्णालयातील दीपक सूर्यवंशी, ज्ञानेश्वर बिराडे उपस्थित होते. रासेयो योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. डी. पी. पाटील, प्रा. भारती खैरनार, प्रा. पूजा पाटील, प्रा. बोरसे, प्रा. सोनवणे, प्रा. एस. टी. सूर्यवंशी यांचे सहकार्य लाभले. प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.


सिताराम गोविंद पाटील कला, विज्ञान आणि वाणिज्य
महाविद्यालय, साक्री (धुळे)
राष्ट्रीय सेवा योजना
आणि
सायकलिंग गृप, साक्री
जागतिक सायकल दिनानिमित्त
सायकल रॅली
Stop Stressing and Start Riding
Burn Fat, Not Oil Adopt Bicycle
Latitude: 20.995288
Longitude: 74.318634
Elevation: 439.54±18 m
Accuracy: 25.2 m
Time: 03-06-2023 07:30
Note: जागतिक सायकल दिनानिमित्त "सायकल रॅली"
Powered by NoteCam


SAKRI
Note cam lite
Address : Sakri,Maharashtra,India
Latitude : 20.994998146779835°
Longitude : 74.318260056898°
Altitude : 428.0 meter
Date : 06/21/2023 07:30 am
Accuracy : 2.0 meter
Time zone : IST
Note : आंतरराष्ट्रीय योगा दिवस


G-20 युवा संवाद
Latitude: 20.99512
Longitude: 74.31804
Elevation: 439.74±10 m
Accuracy: 17.3 m
Time: 07-31-2023 12:03
Note: G20 युवा संवाद
Powered by NoteCam


विद्या विकास मंडळाचे,
सी. गो.पाटील कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
राष्ट्रीय सेवा योजना,
Note cam lite
Address : Karkhana,Maharashtra,India
Latitude : 20.959898801520467°
Longitude : 74.29412637837231°
Altitude : 429.0 meter
Date : 08/09/2023 11:55 am
Accuracy : 7.0 meter
Time zone : IST
Note : मेरी मिट्टी मेरा देश


Note cam lite
Address : Sakri,Maharashtra,India
Latitude : 20.99474476184696°
Longitude : 74.31876054033637°
Altitude : 431.0 meter
Date : 08/11/2023 10:12 am
Accuracy : 3.0 meter
Time zone : IST
Note : विद्यापीठ नामविस्तार दिन


आयोजित
Note cam lite
Address : Sakri,Maharashtra,India
Latitude : 20.99529918283224°
Longitude : 74.31871217675507°
Altitude : 430.0 meter
Date : 08/14/2023 09:38 am
Accuracy : 3.0 meter
Time zone : IST
Note : हर घर तिरंगा


राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना
Note cam lite
Address : Sakri,Maharashtra,India
Latitude : 20.9925745°
Longitude : 74.3160377°
Altitude : 426.0 meter
Date : 08/29/2023 11:59 am
Accuracy : 1700.0 meter
Time zone : IST
Note : माजी आमदार कै. गोजरताई भामरे स्मृतिदिन


Time: 09-26-2023 11:24
Note: NSS inauguration program
Powered by NoteCam


Sitaram Govind Patil Art's, Science & Commerce College,
Sakri , Dist. Dhule
राष्ट्रीय सेवा योजना
(NSS)
n India Campaign"
lastic Free Rally
Note cam lite
Address : Sakri,Maharashtra,India
Latitude : 20.995191684924066°
Longitude : 74.31840749457479°
Altitude : 430.0 meter
Date : 10/01/2023 10:23 am
Accuracy : 3.5 meter
Time zone : IST
Note : स्वच्छता ही सेवा


सावता
अमृत कलश यात्रा
Latitude: 20.995309
Longitude: 74.318799
Elevation: 439.64±8 m
Accuracy: 5.5 m
Time: 10-14-2023 11:37
Note: Meri mati Mera Desh Rally
Powered by NoteCam


Note cam lite
Address : Sakri,Maharashtra,India
Latitude : 20.994914872571826°
Longitude : 74.31824848987162°
Altitude : 426.0 meter
Date : 12/01/2023 11:08 am
Accuracy : 2.5 meter
Time zone : IST
Note : जागतिक एच आय व्ही एड्स दिवस


कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
विद्या विकास मंडळाचे,
सिताराम गोविंद पाटील कला,विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय,साक्री जि.धुळे
योजना (NSS)
Me But You
विद्या विकास मंडळाचे
ता.साक्री जि.धुळे
निवडणूक साक्षरता मंडळ
मतदार जन जागृती
व नविन मतदार नोंदणी अभियान
मतदान का अधिकार,
करो देश साकार.
Note cam lite
Address : Sakri,Maharashtra,India
Latitude : 20.99472280126065°
Longitude : 74.31826835498214°
Altitude : 426.0 meter
Date : 03/28/2024 09:47 am
Accuracy : 3.5 meter
Time zone : IST
Note : राष्ट्रीय मतदार जनजागृती कार्यक्रम